


दैनिक

# मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २४६ •शुक्रवार, दि.०५ डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955




## दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राची फेरपडताळणी

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेत दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळविताना किंवा बदली करताना सादर केलेल्या दिव्यांग प्रमाणपत्राची तपासणी करण्याचे आदेश दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिले होते. त्यानुसार, विविध विभागातंर्गत असलेल्या ६१४ कर्मचाऱ्यांच्या अद्वितीय अपंगत्व ओळखपत्र (यूडीआयडी) मागविला. यापुढे जात मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी या दिव्यांग प्रमाणपत्राची फेरपडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर



पडताळणी ही जिल्ह्याबाहेरील रूग्णालयात केली जाणार आहे. पडताळणीच्या या निर्णयाने दिव्यांग कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदाची धुरा हाती घेतल्यानंतर, मुंढे यांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना पत्र देत दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा परिषद प्रशासनाने विभागांना पत्र काढत, प्रमाणपत्र तपासणी करून (युडीआयडी नंबर) अहवाल मागविले. जिल्हा परिषद अतंर्गत विविध विभागांमध्ये एकूण ६१४ व्यक्तींनी दिव्यांग प्रमाणपत्र सादर करत लाभ घेतला आहे. त्यातील पाच कर्मचाऱ्यांकडे 'यूडीआयडी' उपलब्ध नसल्याचे निर्देशनास आले. सामान्य प्रशासन, शिक्षण व आरोग्य विभागातील प्रत्येकी एक व दोन ग्रामसेवकांकडे हे कार्ड नसल्याने त्यांची खातेंतर्गत चौकशी करण्यात येणार आहे. यातील काही व्यक्तींनी 'यूडीआयडी साठी अर्ज सादर केल्याचे सांगण्यात येते. या व्यतिरीक्त ज्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांनी दिव्यांग प्रमाणपत्र 'यूडीआयडी' सादर केला आहे. असे असताना ६१४ कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राची (यूडीआयडी नंबर) ▶ उर्वरित पान २ वर

## UDID कार्ड न सादर केल्याप्रकरणी 14 शिक्षक निलंबित : विभागीय चौकशीची तयारी

**बीड । प्रतिनिधी**

दिव्यांग कल्याण विभाग, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद बीड अंतर्गत कार्यरत दिव्यांग अधिकारी, कर्मचारी व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या UDIDकार्ड पडताळणी मोहीमेत प्रमाणपत्रांची वैधता तपासली जात आहे. या पार्श्वभूमीवर ८ ऑक्टोबर २०२५ रोजी स्काऊट गाईड भवन, बीड येथे विशेष पडताळणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. मात्र शिबिरास उपस्थित राहून UDID कार्ड सादर करण्याच्या आदेशानंतरही काही शिक्षकांनी आपली प्रमाणपत्रे सादर केली नाहीत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ९१ नुसार अशा प्रकरणात कठोर कारवाईची तरतूद असल्याने शिक्षण विभागाने कडक निर्णय घेत १४ शिक्षकांना निलंबित केले आहे.

निलंबित शिक्षकांची यादी : संपत्ती जाधव रवींद्र धोंडीबा, स.शि., जि.प.प्रा.शा. हातगाव, ता. केज, श्रीमती माने उषा विठ्ठल, स.शि., जि.प.शाळा चौसाळा, बीड, संपत्ती भोसले रामचंद्र छत्रगुण, स.शि., जि.प.शाळा चौसाळा, बीड, श्रीमती चोपडे कल्पना गेणू, स.शि., जि.प.प्रा.शा. डोईठाण, ता. आष्टी, श्री. शिनगारे हेमंत कारभारी, स.शि., जि.प.प्रा.शा. मोरेवाडी, ता. अंबाजोगाई, श्रीमती कंटाळे संजीवनी विक्रम, स.शि., झेडपी प्रा.शाळा रायमोहा, शिरुर, श्री. सय्यद नवाज मौलासाहेब, स.शि., G.P.P.S.S. राधाकृष्ण नगर सिरसाळा, परळी, श्रीमती मुंडे अंजली मारोतीराव, स.शि., G.P.P.S.S. गवळीवस्ती, बीड, श्रीमती देवगुडे शैला साहेबराव, स.शि., G.P.P.S.S. गांधीनगर मराठी, बीड ▶ उर्वरित पान २ वर

## दिसायला देखणी पण खतरनाक खोपडी!

### रिल स्टारची बनली चोर, धडकी भरवणारे कारनामे

**बीड । प्रतिनिधी**

कोण कधी काय करेल याचा नेम नसतो. कुणाच्या चेहऱ्यावर जावू नये असं म्हणतात ते ही खरचं म्हणावं लागेल. कधी कधी काही गोष्टींची सवय लागते आणि भलेभले त्याच्या आहारी जातात. झटपट पैसे कमवणे आणि त्यातून आपले शौक पूर्ण करणारी एक जमात झपाट्याने वाढत आहेत. अशा गोष्टी मुळेच ते वाईट मार्गाला कधी लागतात




हे त्यांनाच समजत नाही. अशीच एक धक्कादायक घटना अहिल्यानगरमध्ये समोर आली आहे. ही घटना एका रिलस्टारबाबत आहे. लोकप्रिय होत असतानाच ती नको त्या गोष्टींच्या नादी लागली आणि शेवटी पोलीसांच्या जाळ्यात अलगद सापडली.


कोमल नागनाथ काळे ही तरुणी अहिल्यानगरची रहिवाशी आहे. विशेष म्हणजे ती रिल स्टार आहे. दिसायला देखणी शिवाय रिल स्टार यामुळे तिचे फॉलोव्हर्सही जास्त आहेत. इंस्टाग्रामवर तिचे पन्नास हजार पेक्षा जास्त फॉलोवर्स आहेत. हा तिचा दाखवण्याचा चेहरा होता. पण खरा चेहरा काही तरी वेगळाच होता. सुजित राजेंद्र चौधर ही तिचा प्रियकर होता. त्याच्या सोबत मिळून हे दोघे ही चोरी करायचे. ही चोरी ते बस स्थानकांवरून करत होते. त्यांनी आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी चोरी करण्याचा सपाटा लावला होता. वाढलेल्या चोऱ्या या मुळे ▶ उर्वरित पान २ वर

## टायर डोक्यावरून गेल्याने तरुणाचा जागीच मृत्यू

### संतप्त जमावाचा ट्रॅक्टरची तोडफोड करण्याचा प्रयत्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील इंदिरानगर भागातील १६ वर्षीय अहात खान आजहर खान पठाण याचा चिंचगव्हाण रोडवर अपघाती मृत्यू झाला. अहात खान हा गॅरेजचे काम पूर्ण करून घरी परत येत असताना ट्रॅक्टरच्या टायरखाली आल्याने जागीच ठार झाला. अपघात



इतका गंभीर होता की, ट्रॅक्टरचा टायर डोक्यावरून गेल्याने त्याचा मेंदू बाहेर आला. हा दुर्दैवी प्रकार सायंकाळी सुमारे ७ वाजता घडला. घटनेनंतर अपघातस्थळी मोठा जमाव तयार झाला. काही लोकांनी ट्रॅक्टर तोडफोड करण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे गोंधळ उडाला. पोलिसांनी ▶ उर्वरित पान २ वर

## बीड, आहिल्यानगर रेल्वेसेवेमुळे प्रवाशांना दिलासा

**अंमळनेर । प्रतिनिधी**

बीड- अहिल्यानगर प्रवास करताना प्रवाशांना नादुरुस्त रस्ते, ठरलेल्या वेळेत न सुटणाऱ्या बस, प्रवाशांनी खच्चून भरलेल्या परिवहन मंडळाच्या बसचा त्रास, तसेच मोडतोड झालेली आसनव्यवस्था अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. 'असून अडचण, नसून खोळंबा' या म्हणीप्रमाणे आणि अन्य पर्याय नसल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता.

मात्र, एक जानेवारी २०२४



रोजी अहिल्यानगर- अंमळनेर रेल्वे सेवा सुरू झाल्यानंतर प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला. नुकतीच दोन महिन्यांपूर्वी अंमळनेर- बीड लोहमार्गाची चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर बीड- अंमळनेर- अहिल्यानगर रेल्वेसेवा सुरळीत सुरू झाली आहे. त्यामुळे बीड परिसरातील प्रवाशांना महामार्गावरील त्रासदायक प्रवासातून मुक्तता मिळाल्याचे प्रवासी सांगतात. सध्या अहिल्यानगर स्थानकातून सकाळी ६.५५ वाजता सुटणारी रेल्वे अंमळनेरला १० वाजता आणि बीडला १२.३० वाजता पोहोचते. त्यानंतर परतीच्या मार्गाने ती पुन्हा अहिल्यानगरकडे रवाना होते. या रेल्वे सेवेला प्रवाशांकडून प्रतिसाद मिळत असून दररोज मोठी गर्दी पाहायला मिळते. दरम्यान, बीड- परळी लोहमार्गाची उर्वरित कामे तातडीने ▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्रातील ८० हजार शाळा आज बंद, लाखो विद्यार्थी घरी बसणार; काय कारण ?

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांवर आज घरी बसण्याची वेळ येणार आहे. कारण राज्यातील ८० हजारहून अधिक शाळा आज बंद राहणार आहेत. शिक्षक रस्त्यावर उतरले आहेत. वेतन कपात होऊनही शिक्षक मागे हटण्याच्या मनात नाहीत. हा बंद यशस्वी झाल्यास शासनाला धोरण बदलावे लागण्याची शक्यता मोठी आहे. काय आहे कारण? सविस्तर जाणून घेऊया.

शिक्षक संघटना २०२४ च्या नव्या संच मान्यता धोरणाला आणि टीईटी परीक्षेमुळे निर्माण झालेल्या गोंधळाला कडवा विरोध करत आहेत. या धोरणामुळे हजारो शाळांमध्ये फक्त १-२ शिक्षकच राहतील, विद्यार्थ्यांचे खूप मोठे शैक्षणिक नुकसान होईल, असा संघटनांचा दावा आहे. म्हणून राज्यातील सुमारे ८० हजार सरकारी व खासगी अनुदानित शाळा आज पूर्ण बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे.

हा बंद फक्त एका संघटनेचा नाही, असे म्हणत विरोधी पक्षांसह सत्ताधारी पक्षातील शिक्षक आमदारांनीही बंदला उघड पाठिंबा दिला आहे. त्यामुळे शिक्षक विरुद्ध शासन असे ▶ उर्वरित पान २ वर

## उमेद पोर्टलवरील अडचणी वाढल्या

### वक्फ संपत्तीअपलोडसाठी तारीख वाढवा

**खा.बजरंग सोनवणे यांची केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांच्याकडे मागणी**

**बीड । प्रतिनिधी**

वक्फ संस्थांच्या संपत्तीचे ऑनलाईन नोंदणीकरण उमेद पोर्टलवर सुरू असताना गेल्या काही दिवसांपासून या पोर्टलला गंभीर तांत्रिक अडचणी येत असल्याने नोंदणीचे काम ठप्प झाले आहे. यामुळे वक्फ संपत्ती अपलोडसाठी अंतिम तारीख वाढवावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांची भेट घेत पत्राद्वारे केली आहे.

खा.बजरंग सोनवणे यांनी



केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांची त्यांच्या कार्यालयात जात भेट घेतली. यावेळी वक्फ संपत्ती अपलोडच्या संदर्भात येणाऱ्या अडचणीबाबत सविस्तर चर्चा देखील केली. यावेळी रिजिजू यांना रितसर पत्रही दिले असून पत्रात म्हटले आहे, वक्फ संपत्ती अपलोडसाठी लॉग-इन आणि क्रॅश सारख्या समस्येमुळे महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये हजारो नोंदी प्रलंबित राहत आहेत. देशभरात अद्याप फक्त ४५,११६ वक्फ संपत्तींचेच अपलोडिंग पूर्ण झाले आहे, मोठ्या प्रमाणात रेकॉर्ड व मेपिंग तपासणीत अडकून आहेत, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि ▶ उर्वरित पान २ वर

## बापरे! चक्क हद्दपार आरोपीने पोलिस ठाण्याच्या आवारातूनच चोरला ट्रॅक्टर

**बीड । प्रतिनिधी**

पोलिस ठाण्याच्या आवारात जप्त करून ठेवलेला वाळूने भरलेला ट्रॅक्टर थेट हद्दपार केलेल्या आरोपीने चोरून नेल्याची अत्यंत धक्कादायक घटना शिरूर कासार येथे उघडकीस आली आहे. हा प्रकार वेळीच निदर्शनास आल्याने आरोपीला ट्रॅक्टरसह ताब्यात घेतले असले तरी, या घटनेमुळे पोलिसांच्या कारभारावर आणि गुन्हेगारांवरील वचकवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, याच पोलिस ठाण्यात मागील आठवड्यात एका पीडितेच्या आईला मदत न केल्याचा प्रकारही घडला होता.

१ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास, हद्दपार केलेला आरोपी दीपक आनंदा तळेकर (वय ३७, रा. फुलसांगवी, ता. शिरूर कासार) हा जुन्या शिरूर कासार पोलिस ठाण्याच्या आवारातून जप्त केलेला ट्रॅक्टर घेऊन जात होता. याची माहिती




पोलिसांना मिळताच, त्याला सिद्धेश्वर चौकात ताब्यात घेण्यात आले. त्याने हा ट्रॅक्टर चौघांच्या मदतीने चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून ट्रॅक्टर, ट्रॉली आणि वाळूसह एकूण ६ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात सहायक फौजदार राम यादव यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, आरोपी सध्या पोलिस कोठडीत असल्याचे सांगण्यात आले. या घटनेबाबत बाजू समजून घेण्यासाठी सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण जाधव यांना वारंवार संपर्क करूनही त्यांनी कॉल न घेतल्याने त्यांची बाजू ▶ उर्वरित पान २ वर

## सावधान : राष्ट्रीय महामार्ग ५२ (बीड ते तुळजापूर) प्रवाशांसाठी सतर्कतेचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

बीड ते तुळजापूर दरम्यान प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी बीड पोलीस आणि महामार्ग सुरक्षा पथकाकडून अत्यंत महत्त्वाचे आवाहन करण्यात येत आहे. खालील धोकादायक ठिकाणी चोरी, लुटमार आणि दरोड्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. चोरट्यांची लुटमार करण्याची कार्यपद्धती : गुन्हेगार



**● धोकादायक ठिकाणे :**

**या १० ठिकाणी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे: १. मांजरसुंबा घाट (बीड) २. चौसाळा बायपास ३. पारगाव बायपास ४. सरमकुंडी फाटा ५. इंदापूर फाटा ६. पार्डी फाटा ७. घुले माळ जवळील उड्डाणपूल ८. तेरखेडा ते येडशी टोल नाका ९. येडशी बायपास १०. धाराशिव ते तुळजापूर**

प्रामुख्याने खालील प्रकारे लुटमार करत असल्याचे निदर्शनास आले आहे: कृत्रिम अपघात :महामार्गावर धावत्या वाहनांसमोर अचानक जॅक किंवा खिळे असलेले लाकडी ओंडके टाकून अपघात घडवणे व मदत करण्याच्या बहाण्याने लुटणे. शस्त्रांचा धाक: वाहन अडवून शस्त्राचा धाक दाखवून जबरी चोरी करणे. दुचाकीस्वारांना लक्ष करणे: धावत्या दुचाकीला धक्का देणे किंवा मागे बसलेल्या प्रवाशाला ओढून खाली पाडणे. तसेच पाठलाग करून 'चैन स्नॅचिंग' करणे. कृत्रिम गतीरोधक तयार करुन ठिबक चे पाईप बंडल वापरून गतिरोधक असल्याचे ▶ उर्वरित पान २ वर



# जागतिक मृदा दिवस: मातीचा एक साद आपल्या अस्तित्वाची आठवण

माती ही फक्त धरणी नाही, ही आपली जन्मदात्री आहे. आपण चालतो त्या रस्त्यांची, उगवतो त्या अन्नाची, वाढतो त्या श्वासाची, आणि जगतो त्या प्रत्येक क्षणाची अदृश्य संरक्षिका. पण या मातीला आपण शेवटचा स्पर्श कधी केला? किंवा तिचं दुःख, तिची तहान, तिची थकलेली छाती शेवटची कधी ऐकली?

म्हणतात ना – झाड जमिनीला विचारत नाही की तू माझी आई आहेस का; पण जमीन सांगत असते – 'अरे, मीच तुझं घर आहे.'

आज ५ डिसेंबर – जागतिक मृदा दिवस. हा दिवस म्हणजे पृथ्वीच्या अंतःकरणाची एक हळवी नोट, एक शांत हाक – माझी काळजी घे नाहीतर तुम्ही स्वतःलाच हरवाल.

भारताची माती ही सोन्यासारखी सुपीक, पण आज तीच माती रसायनांच्या ओझ्याखाली कण्हतेय. कधी काळी हिरव्या शेतांनी सजणारी भूमी आज पाण्याअभावी भेगा पाडतेय. पावसाच्या अनियमिततेने थकलेली माती, अति खतांच्या वापराने दमलेली माती, प्लास्टिक आणि कचऱ्याने दूषित बनलेली माती – ही आपली दुःखांतिका आहे. मातीचा विनाश म्हणजे केवळ कृषीचा विनाश नव्हे; तो आपल्या पोटाचा, आपल्या पिढ्यांचा आणि पृथ्वीच्या भवितव्याचा विनाश आहे.

मातीचे आरोग्य म्हणजे अन्नाचे आरोग्य; अन्नाचे आरोग्य म्हणजे माणसाचे आरोग्य. ही शृंखला तुटली तर जीवनच तुटते.

जग आज उष्णतेच्या संकटात आहे. पृथ्वीचे तापमान वाढत आहे, हिमनद्या वितळत आहेत, वादळे दाटून येत आहेत. पण या सर्वांच्या मागे एक शांत साक्षीदार आहे – माती. ती रागावत नाही, आवाज करत नाही; पण तिच्या शांततेतही एक किंकाळी दडलेली आहे. तिच्या या शांत किंकाळीला आपण ऐकू शकू का?

माती सांगते –<br>
मी तुला धान्य देते, तू मला विष देतोस.<br>
मी तुला झाडं देते, तू माझी मूळं कापतोस.<br>
मी तुझी घरं पायाभरणीसारखी सांभाळते,<br>
तू मात्र माझ्याच छातीत प्लास्टिक ढकलतोस.


ही केवळ कविता नाही, ही वास्तवाची वेदना आहे. आजच्या दिवशी जगभरातील शास्त्रज्ञ, शेतकरी, पर्यावरणप्रेमी एकत्र येतात – मातीचे संवर्धन करण्यासाठी. सेंद्रिय शेती, पाणीरोधक बंधारे, वृक्षारोपण, पिकांची फेरपालट, रासायनिक खतांचा मर्यादित वापर – हे उपाय म्हणजे मातीला मलमपट्टी. तिच्या जखमा भरून काढण्याचा प्रयत्न. भारतासारख्या देशात माती ही संस्कृती आहे.

मातीचा सुगंध म्हणजे जगण्याचा श्वास असे इथल्या लोकगीतांतही म्हटले आहे. आपल्या कृषी सभ्यतेचा पाया हीच माती – तिच्याशिवाय मानवाचे अस्तित्वच नाही. म्हणूनच, आजच्या जागतिक मृदा दिवशी... आपण एक वचन द्यायचं – माती वाचवू पिढ्या वाचवू.

धरणीकुमारीला आपण पुन्हा सुपीक, निरोगी, हिरवीगार बनवूया.

कारण शेवटी –<br>
माती नाही तर माणूस नाही.<br>
माती जगली तरच पृथ्वी श्वास घेईल.

मातीसाठी एक स्पर्श, एक प्रयत्न, एक वचन आजपासून.



– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके, तहसीलदार, बीड

# स्वयंसेवा: सामाजिक परिवर्तनाचा निस्वार्थ प्रवास

समाजाची खरी ताकद ही फक्त त्याच्या आर्थिक, भौतिक किंवा तांत्रिक प्रगतीत नसते, तर समाजातील लोकांची एकमेकांसाठी असलेली संवेदनशीलता, नाती, कर्तव्यभावना आणि परस्पर सहयोगी संस्कृती यांत असते. व्यक्तीला व्यक्तीशी जोडणारा आणि समाजाला अधिक मानवी बनवणारा जो सर्वात महत्त्वाचा सेतू आहे, तो म्हणजे 'स्वयंसेवा' होय. आधुनिक जगातील वाढत चाललेला व्यक्तिकेंद्रीवाद, उपभोक्तावाद आणि भौतिक स्पर्धा यांच्या गर्जनेतही स्वयंसेवेचे निस्वार्थ मूल्य अजूनही अढळ आहे आणि हीच स्वयंसेवेची माती जागतिक पातळीवर समाजातील बदलांचे बीज रोवते. स्वयंसेवेचे महत्व अधोरेखित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने ०५ डिसेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन' म्हणून घोषित केला. स्वयंसेवकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आपल्याला या सामाजिक कार्यकर्त्यांच्या योगदानाची जाण करून देतो आणि अधिकाधिक लोकांना समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देतो.

स्वयंसेवा म्हणजे केवळ एखाद्या संस्थेशी जोडले जाणे किंवा त्यांच्या माध्यमातून काम करणे एवढेच नव्हे; ती एक मानवी प्रवृत्ती आहे. स्वयंसेवा ही नोकरी नसते, त्यासाठी पगार नसतो; पण त्यात समाधान, आत्मिक आनंद आणि समाजकारणाची अनुभूती असते. व्यक्ती जेव्हा निस्वार्थपणे, कोणतेही भौतिक अपेक्षा न ठेवता समाजातील इतरांच्या कल्याणासाठी काम करते, तेव्हा त्या कार्यात निर्माण होणारा मूल्यांचा, अनुभवांचा आणि भावनांचा संयोग समाजबांधणीची मूळ व्याख्या तयार करतो. समाजशास्त्रीय दृष्टीने स्वयंसेवा ही सामाजिक ऐक्य, सहकार्य, समता आणि मानवी हक्कांच्या संरक्षणाला बळ देणारी प्रक्रिया आहे. ती सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी नागरी समाजाला सक्रिय करते आणि लोकतांत्रिक मूल्ये दृढ करते.

भारतातील लोकजीवनात स्वयंसेवेची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. आपल्याकडे दान, सेवा, सहकार्य, परोपकार यांना नेहमीच सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. धर्म, अध्यात्म, संतपरंपरा, भिक्षादान, अन्नदान, वृक्षारोपण, जलसंधारण, वाचनालये, लोकशिक्षण, स्वातंत्र्यलढा या सर्व क्षेत्रांत स्वयंसेवकांनी निभावलेली निर्णायक भूमिका महत्त्वाची असून यासाठी इतिहास साक्षीदार आहे. महात्मा गांधींच्या 'सर्वोदय' आणि 'सार्वजनिक कल्याण' या संकल्पनांनी स्वयंसेवेचे व्यापक आणि वैज्ञानिक रूप स्पष्ट केले. आधुनिक काळातील स्वयंसेवा ही केवळ लोककल्याणापुरती मर्यादित नसून, ती पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, बालहक्क, मानवाधिकार, अपंगकल्याण, प्राणीसंवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, आणि जनसहभागाच्या सर्व बाबींमध्ये अत्यंत परिणामकारक ठरलेली आहे. सामाजिक बांधिलकी जपण्याची भूमिका निभावताना स्वयंसेवक समाजातील विषमता आणि अन्यायाविरुद्ध जनजागृती करतात, सत्ता आणि प्रशासनाला उत्तरदायी ठेवतात, तसेच दुर्लक्षित समुदायांना आधार देण्यासाठी पुढाकार घेतात.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता स्वयंसेवा सामाजिक भांडवल निर्माण करते. समाजातील विश्वास, नातेसंबंध आणि एकात्मता वाढविण्यात स्वयंसेवेची क्षमता अद्वितीय आहे. स्वयंसेवक जेव्हा एखाद्या समस्येला भिडतात, तेव्हा ते फक्त त्या समस्येचा उपचार करत नाहीत, तर त्या समस्येच्या कारणांचा वेध घेतात. त्यामुळे सामाजिक बदलाची प्रक्रिया गतीमान होते. स्वयंसेवेचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे या माध्यमातून नागरीकांमध्ये 'असण्याची' आणि 'योजनेचा सक्रिय भाग असल्याची' भावना मजबूत होते. हीच भावना व्यक्तीला समाजाच्या विकासात स्वतः चे अस्तित्व अधोरेखित करण्याची प्रेरणा देते.

स्वयंसेवेची आवश्यकता आज अधिक तीव्रतेने जाणवते कारण जग वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान आणि अर्थकारणाच्या झपाट्याने होणाऱ्या वाढीमुळे अनेक नवीन सामाजिक प्रश्न उभे राहत आहेत. बेरोजगारी, मानसिक आरोग्य, कुपोषण, नैसर्गिक आपत्ती, डिजिटल दरी, भटक्या विमुक्त समुदायांचे प्रश्न, वृद्धांची काळजी, मुलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे, जलवायू परिवर्तन आणि प्रदूषण अशा अनेक समस्या सरकार किंवा प्रशासन एकटी हाताळू शकत नाहीत. हे सत्य आपण कोविड–१९ महामारीच्या काळात प्रत्यक्ष अनुभवले, जेव्हा स्वयंसेवकांनी आरोग्य यंत्रणेसोबत हातात हात घालून मोठ्या प्रमाणात जनतेला मदत केली. रुग्णालयांमध्ये मदत, अन्नदान, औषध व ऑक्सिजनची उपलब्धता करून देणे, जनजागृती मोहीमा, समुपदेशन या सर्व आघाड्यांवर कार्यरत असलेल्या स्वयंसेवकांनी समाजातील आशेचा दिवा प्रज्वलित ठेवला. आज स्वयंसेवा ही युवांची ओळख बनत चालली आहे. तरुणाईच्या ऊर्जेला योग्य दिशा देणारी ही एक महत्त्वाची संधी आहे. राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्रसेना (NCC), रेडक्रॉस, स्काउट–गाईड, युवा मंडळे, स्वयंसेवी संस्था (NGO) यांच्यामाध्यमातून लाखो युवक समाजकार्यात सक्रिय झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून निर्माण झालेले नेतृत्व सामाजिक परिवर्तनाचे इंजिन बनले आहे. स्वयंसेवा युवकांना जीवनदृष्टी देताना समाजाला विकासाचा हात देत राहते. तरुणांची नवोन्मेषी विचारशक्ती आणि स्वयंसेवेची संवेदनशीलता यांचे एकत्रीकरण हे समाजहिताचे सर्वात मजबूत सूत्र आहे. पण स्वयंसेवेच्या या तेजस्वी चित्रामागे काही आव्हाने देखील आहेत. अनेक स्वयंसेवी संस्था पारदर्शकतेअभावी किंवा राजकीय स्वार्थाच्या विळख्यात अडकतात, तर काही ठिकाणी स्वयंसेवकांचे शोषणही होते. योग्य प्रशिक्षण, सुरक्षा आणि मानसिक आधाराची कमतरता दिसून येते. तसेच, स्वयंसेवा ही फक्त सामाजिक प्रतिमा निर्माण करण्याचे साधन आहे, असा गैरसमजही कुठेकुठे आढळतो. म्हणूनच स्वयंसेवेचे संस्थाकरण करताना मूल्यशिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, तसेच नैतिक तत्वांचा आग्रह ही आवश्यक बाब आहे. स्वयंसेवा म्हणजे फक्त फोटो काढून सामाजिक माध्यमांवर टाकणे नव्हे; तर प्रत्यक्ष जिथे तुटलेल्या हातांना आधार द्यायचा आहे, जिथे डोळे आसवे पुसण्याची वाट पाहत आहेत, जिथे एखादी आकांक्षा उजेडाच्या शोधात आहे, तिथे पोहोचणे हे स्वयंसेवेचे खरे ध्येय आहे.

'आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन' आपल्याला आठवण करून देतो की प्रत्येक व्यक्ती समाजासाठी महत्त्वाची आहे. आपल्या थोड्याश्या प्रयत्नात कोणाचातरी संपूर्ण जग दडलं असतं. आज जगात करोडो स्वयंसेवक आपली स्वार्थरहित सेवा देत आहेत आणि मानवी मूल्यांचा झेंडा उंचावत आहेत. त्यांची ही कृतिशीलता समाजाला दिशा देते, मानवतेला आधार देते आणि भविष्यासाठी आशेचा किरण ठरते. या दिवशी समाजातील सर्व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून आपण सर्वांनीही आपल्या क्षमतेनुसार समाजासाठी काहीतरी करण्याचा संकल्प करायला हवा. जग बदलण्यासाठी मोठ्या क्रांतींची गरज नसते; एखादी छोटी सेवा, एखादे घेतलेले पाऊल, एखादे समजूतदार नाते – एवढ्यानेही परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. कधी कधी एखाद्याची स्मितही जग बदलू शकते. म्हणूनच, आजचा दिवस आपल्याला पुन्हा एकदा सांगतो सेवा हीच मानवतेची खरी भाषा आहे. आपण सर्वांनी एकमेकांसाठी जगलो, तर जगही आपल्यासाठी जगेल. मनाची उदारता म्हणजेच स्वयंसेवा, आणि स्वयंसेवा म्हणजेच मानवतेचा सर्वात सुंदर चेहरा होय. या व्रताला, या संस्काराला, या मानवी मूल्याला शतशः वंदन!

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान ४ वरून पुढे...

## बीडमध्ये 'हमारा...

जिल्हा प्रशासनाच्या म्हणण्यानुसार १० डिसेंबर रोजी 'उत्कृष्ट शौचालय पुरस्कार' देण्यात येणार आहेत. मात्र, प्रत्यक्षात या मोहिमेची कोणतीही माहिती संबंधित शाळांना देण्यात आलेलीच नाही, असे चित्र दिसून येत आहे. लिंबागणेश केंद्रीय प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक दिपक घाटे यांनी सांगितले की, मोहीमेसंदर्भात आम्हाला कोणतेही पत्र, आदेश किंवा सूचना मिळाल्या नाहीत. यावर प्रतिक्रिया देताना डॉ. गणेश ढवळे म्हणाले, म्हणूनच स्पष्ट होते की मोहीम फक्त कागदावर आहे, जमिनीवर काहीच नाही. बेलगाव वस्ती शाळेसाठी ग्रामस्थांचा त्याग – ६ गुंठे जमीन, ५० हजारांची लोकवर्गणी; तरीही स्वच्छतागृह नाही. लिंबागणेश केंद्रीय जिल्हा परिषद अंतर्गत बेलगाव वस्ती शाळेची रंगरंगोटी व लाईटफिटींग ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून केली आहे. या कामांसाठी जवळपास ५० हजार रुपये जमा करून खर्च करण्यात आला. शाळेसाठी ६ गुंठे जमीन स्वतःहून देण्यात आली. मात्र, शौचालयाची किमान सोयसुद्धा उपलब्ध करून देण्यास शासन अपयशी ठरत असल्याने पालकांत संताप व्याप्त आहे. पालक सुखदेव कोळपे म्हणाले, आम्ही स्वतः पैसे जमवून शाळेला रंगरंगोटी केली, लाईटफिटींग केली. जमीनही दिली. निदान आमच्या लेकरांसाठी शासनाने एक तरी स्वच्छतागृह उभारावे.

◆ पान ४ वरून पुढे...

## पत्रकार अविनाश...

क्षेत्रांतील गोरगरीब व सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या दखलमध्ये हा पुरस्कार देण्यात आला आहे.आयोजन समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार सीताराम पोकळे यांनी ही माहिती देताना सांगितले की, हा पुरस्कारवितरण सोहळा लवकरच अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. पत्रकार अविनाश कदम यांना या आधीही दिल्ली, मुंबई, पुणे, बीड, पनवेल, अहिल्यानगर येथील विविध सामाजिक व पत्रकारीय संस्थांकडून अनेक सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पत्रकार कदम यांना जिजाऊ माँसाहेब राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा, आष्टी तालुका युवा पत्रकार संघ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन व कौतुक व्यक्त केले जात आहे.

## बीडमध्ये स्पर्धा ...

घटनास्थळावरून फरार झाले. या गंभीर प्रकरण व गुन्ह्याचे तरुणीने पोलीस ठाणे शिवाजीनगर बीड येथे तक्रार दिली व गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## देवी बाबुळगाव...

काढली आणि रस्त्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी विविध प्रयत्न केले . अखेर या रस्त्यावर मुरूम टाकण्यात आला आणि काम पूर्ण करण्यात आले . गुरुवार दि . ४ डिसेंबर रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वतः या रस्त्याला भेट दिली . त्यांच्या सोबत मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे , ग्राम महसूल अधिकारी कमलेश निर्मळ आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते . त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि रस्ता खुला झाल्याचे जाहीर केले . अनेक वर्षे अडकलेला प्रश्न प्रशासनाच्या पुढाकारामुळे मिटला असल्याने ग्रामस्थांनी तहसीलदारांचे मनापासून आभार मानले . या रस्ता खुला करण्याच्या कामात ज्यांची उपस्थिती नोंदवली गेली त्यात भास्कर जोगदंड , भारत शिंदे , कैलास शिंदे , अण्णा नायनवाडे , सखाराम जोगदंड , गोवर्धन जोगदंड , रत्नाकर जोगदंड , विकास जोगदंड , बाबू जोगदंड , बारकू शिंदे , लहू जोगदंड , बंकट जोगदंड , मेहर जोगदंड , संतोष जोगदंड , सुरेश जोगदंड , सुदर्शन जोगदंड , बंडू जोगदंड , बापू जोगदंड , अशोक जोगदंड , मोहन जोगदंड , पोपट जोगदंड यांचा समावेश आहे . गावाच्या पायवाटेवर आज मुरूम नाही , तर आशेचा नवा पाया टाकला गेला आहे . संघर्षाच्या वर्षानुवर्षांच्या धुळीत दडलेला दिलासा आता शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलून आला आहे . अधिकारी व ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांतून अखेर हा रस्ता खुला झाला आणि हिंगणीकडे जाणारा मार्ग नव्या शक्यतांनी उजळून निघाला आहे .

◆ पान ४ वरून पुढे...

## बाळराजे पवार...

कसा फायदा करून घेतला? तेव्हा ते का वाईट वाटले नाही? याचे उत्तर द्यावे. गेवराई नगर परिषद मध्ये नगराध्यक्षसह सर्व उमेदवार पूर्ण ताकतीने भारतीय जनता पार्टीचे निवडून येणार असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटात खळबळ माजली आहे. त्यामुळे बाळराजे पवार यांना बदनाम करण्याचा कुटील डाव हे विरोधक करत आहेत. याला गेवराईची जनता कधीही भीक घालणार नाही. प्रभाग क्रमांक १० मधील बुथवर जो प्रकार झाला, त्याला जबाबदार कोण? हे तेथे उपस्थित असलेल्या पोलिस कर्मचारी, निवडणूक कर्मचारी आणि शेकडो गेवराईकरांना माहित आहे. यानंतरही तुम्ही माजी आमदार लक्ष्मणराव पवार आणि बाळराजे पवार यांच्या घरावर कार्यकर्त्यांसह चाल करून आलात ते कशासाठी? हेही गेवराईकरांना माहित आहे. निवडणूक ही निवडणुकीप्रमाणे घ्यावी. यामध्ये हार जीत होत असते, ती मोठ्या मनाने स्वीकारावी सुद्धा लागते. शांत गेवराईला अशांत करून बाळराजे पवार यांना बदनाम करत आपणच कसे साहू आहोत हे दाखवण्याचा केविलवाना प्रयत्न बीडच्या पंडितांनी बंद करावा. कारण ही नौटंकी गेल्या अनेक वर्षांपासून संपूर्ण गेवराई तालुका पाहत आलेला आहे. याला यापुढे कोणीही भीक घालणार नाही हे समजून घ्यावे.

◆ पान ९ वरून पुढे...

## दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या...

फेरपडताळणी करण्याचे निर्देश पवार यांनी प्रशासनाला दिले आहे. काही कर्मचाऱ्यांनी जिल्हा रूग्णालयातून तर काहींनी धुळे येथील रूग्णालयातून हे प्रमाणपत्र मिळविलेले आहेत. त्यामुळे या सर्व प्रमाणपत्रांची इतर जिल्हयातील शासकीय मान्यताप्राप्त रूग्णालयातून फेर पडताळणी करून घेण्यात येणार आहे. फेर पडताळणी करण्याची जबाबदारी ही समाजकल्याण अधिकारी हर्षदा बडगुजर यांच्यावर सोपविली आहे. त्या अनुषगांने त्यांनी पहिल्या टप्यात ९८ बहिरेपणा प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राची पडताळणी करणाची कार्यवाही सुरू केली आहे. बदल्या अडचणीत येणार– जिल्हा परिषदेच्या अतंर्गत बदली प्रक्रीया राबवितांनाही काही कर्मचाऱ्यांनी दिव्यांग प्रमाणपत्र सादर करत, बदल्या करून घेतलेल्या आहेत. काही कर्मचारी या प्रमाणपत्राचा आधार घेऊन मुख्यालयात ठाण मांडून आहेत. त्यामुळे या सर्व कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राची पडताळणी होणार असल्याने कर्मचारी वर्गाचा जीव टांगणीला लागला आहे.

## UDID कार्ड न....

श्री. मनोज नरसिंगराव सुर्यवंशी, स.शि., जि.प.प्रा.शा. जोडवाडी (उजनी केंद्र), अंबाजोगाई, श्री. भोसले आश्रुबा विश्वनाथ, स.शि., जि.प.के.प्रा.शा. येळंबघाट, बीड, श्री. वाटमांड सिद्धू आसाराम, स.शि., जि.प.प्रा.शा. भोपालेवस्ती, पाटोदा, श्री. भोसले प्रकाश बलभीम, स.शि., जि.प.प्रा.शा. पिठी, पाटोदा, श्रीमती बहिर सुनंदा धोडोबा, स.शि., जि.प.के.प्रा.शा. कुसळंब, पाटोदा, प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, UDID कार्ड पडताळणीसाठी पुन्हा पुन्हा नोटिसा देऊनही अनुपस्थिती दाखवणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई अनिवार्य आहे. प्रमाणपत्रे न सादर करणाऱ्या संबंधित सर्व शिक्षकांवर विभागीय चौकशी सुरू केली जाणार असून, पुढील आदेश येईपर्यंत ते निलंबित राहतील. या कारवाईमुळे जिल्हा परिषदेतील इतर कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, दिव्यांग सवलतींचा गैरवापर रोखण्यासाठी प्रशासन कठोर भूमिकेत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## दिसायला देखणी...

पोलीसांसमोर मोठं आव्हान निर्माण झालं होतं. दिवसेंदिवस तक्रारी ही वाढत होत्या. त्यात या चोऱ्या कोण करत आहे याचा पत्ता लागत नव्हता. त्यामुळे पोलीसांनी आपले जाळे विणले. खबऱ्यांना ॲक्टीव्ह करण्यात आले. शेवटी पोलीसांच्या तपासाला यश आले. एका खबऱ्या मार्फत कोमलची माहिती पोलीसांना मिळाली. ती चोरी करण्यासाठी पार्थर्डी बस स्थानकात आल्याचं पोलीसांना समजलं. त्यानुसार सापळा रचण्यात आला. त्यावेळ कोमल तिथे दिसून आली. संधी मिळताच पोलीसांनी तिला ताब्यात घेतलं. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या पथकाने ही कारवाई केली. त्यानंतर पोलीसांनी आपल्या पद्धतीने कोमलकडजे चौकशी केली. त्यानंतर ती पोपटा सारखी बोलू लागली. तिने चोरी करत असल्याचे कबुल केले. शिवाय चोरी का करत आहे याची ही माहिती पोलीसांनी दिली. त्याच बरोबर या चोऱ्या आपण एकट्याने केल्या नाहीत तर आपल्या सोबत प्रियकर सुजित राजेंद्र चौधर असल्याचं ही तिने पोलीसांना सांगितलं. आपण केलेल्या चोरीचा सर्व माल आपण सुजितकडेच देत असल्याचं ही तीने कबुल केलं.

तो शेवगावला असल्याची माहिती पोलीसांनी तिने दिली. त्यानुसार तातडीने कारवाई करत पोलिसांनी सुजितला शेवगाव येथून अटक केली. अशा पद्धतीने ही बंटी– बबलीची जोडी गजाआड झाली. त्या आधी या जोडीकडून पोलिसांनी ९ लाख ३५ हजार २३० किमतीचा ऐवज जप्त केला आहे. यात ६.५ तोळे सोन्याचे दागिने, दीड लाखांहून अधिक किमतीचा आयफोन १७ प्रो मॅक्स आणि इतर रोख रक्कम व मोबाईलचा समावेश आहे. पाथर्डी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिकचा तपास पाथर्डी पोलिस करीत आहेत.

## टायर डोक्यावरून...

जमाव नियंत्रणात आणण्यासाठी मोठा प्रयत्न केला, अन्यथा ट्रॅक्टर जाळून टाकला असता. माजलगाव शहराजवळील चिंचगव्हाणसमोर राष्ट्रीय महामार्गावर उसाने भरलेला ट्रॅक्टर कारखान्याकडे जात होता. अहात खान आपल्या मोटरसायकलवरून घरी येत असताना ट्रॅक्टर आणि त्याच्या ट्रॉलीच्या पाठीमागील चाकाखाली आल्यामुळे हा अपघात झाला. ट्रॅक्टर चालकाने त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला, पण अपघात टाळता आला नाही. पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ घटनास्थळी दाखल झाले आणि जमाव शांत करण्याचे प्रयत्न केले. शवविच्छेदनासाठी मृतदेह माजलगाव ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला आहे. अहात खानच्या अपघाती मृत्यूमुळे इंदिरानगर परिसरात शोककळा पसरली आहे.

## बीड, आहिल्यानगर...

पूर्ण करून ही सेवा लवकर सुरू करावी, अशी मागणी रेल्वे प्रवासी वर्गाकडून जोर धरत आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

## महाराष्ट्रातील ८०...

थेट आमने–सामने चित्र निर्माण झाले आहे.

माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी बंद करणाऱ्या शिक्षकांचे एक दिवसाचे वेतन कापण्याचा स्पष्ट आदेश काढला आहे. तरीही शिक्षक संघटना आपल्या निर्णयावर ठाम आहेत. वर्षातून दोनदा टीईटी आणि संच मान्यतेवर तात्पुरती स्थगिती देऊनही शिक्षकांचा रोष कमी झालेला नाही. आज राज्यभर शिक्षण विभागाच्या सर्व कार्यालयांसमोर शिक्षक मोठ्या संख्येने जमून निवेदने देणार आहेत. शिक्षक सेना, प्राथमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद आदी सर्व प्रमुख संघटना एकत्र आल्या आहेत. विद्यार्थ्यांचे भविष्य आणि शिक्षकांचे हक्क वाचवण्यासाठी हा लढा असल्याचे ते म्हणत आहेत. आता वर्षातून दोनदा टीईटी घेतली जाईल आणि संच मान्यतेवर तात्पुरती स्थगिती दिली आहे. शिक्षकांनी विधायक सूचना दिल्यास शासन नक्कीच विचार करेल पण शिक्षकांना हे पुरेसे वाटत नाही, त्यांना धोरण पूर्णपणे रद्द हवे आहे, अशी प्रतिक्रिया शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली.

## उमेद पोर्टलवरील....

महाराष्ट्रात हजारो नोंदींचे अपलोडिंग प्रलंबित आहे, पोर्टल रात्रीच्या वेळेत काही मिनिटेच कार्यरत राहते आणि नंतर लगेच क्रॅश होते, अशी तक्रारही अनेक संस्थांनी केली आहे, सध्याची अंतिम मुदत ५ डिसेंबर २०२५ इतकी आहे. मात्र अशा तांत्रिक बिघाडांत पूर्ण प्रक्रिया करणे अशक्य असल्याचे खा.बजरंग सोनवणे यांनी सांगितले. वेळमर्यादा न वाढवल्यास अनेक वक्फ संस्थांचे महत्त्वाचे रेकॉर्ड प्रलंबितच राहतील, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. बीड जिल्ह्यासह राज्यातून वक्फ संस्थांच्या संपत्तीचे ऑनलाईन नोंदणीकरण उमेद पोर्टलवर सुरू असताना गेल्या काही दिवसांपासून या पोर्टलला गंभीर तांत्रिक अडचणी येत असल्याने नोंदणीचे काम ठप्प झाले असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. याबाबतीत खा.बजरंग सोनवणे यांनी तातडीने केंद्रीय मंत्र्यांची भेट घेत हा महत्वाचा विषय मांडला. बीडसह महाराष्ट्र आणि देशभरात ही समस्या असल्याचेही केंद्रीय मंत्र्यांना सांगीतले. यावर योग्य ती कार्यवाही करू, अशा शब्दात केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी सकारात्मकता दाखविली.

## बापरे! चक्क हद्दपार ...

समजली नाही. पोलिस ठाण्यात एकाच आठवड्यात घडलेल्या या दोन प्रकारांमुळे शिरूर कासार पोलिस ठाण्याच्या कारभारावर नागरिकांमध्ये

◆ पान ९ वरून पुढे...

नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह– सर्वात गंभीर बाब म्हणजे, आरोपी दीपक तळेकर याला १३ मार्च २०२५ रोजी चकलांबा पोलिसांच्या प्रस्तावानंतर बीड जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातून एक वर्षाच्या कालावधीकरिता हद्दपार केले होते. असे असतानाही तो केवळ जिल्ह्यात उपस्थित राहिला नाही, तर थेट पोलिस ठाण्याच्या आवारातील जप्त मुद्देमालाची चोरी करत असल्याने पोलिसांच्या वचकवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. पोलिसांची प्रतिमा मलीन– मागील काही दिवसांपासून बीड पोलिसांवरच आरोप होऊ लागले आहेत. यापूर्वी गेवराई ठाण्यातील कर्मचारी लाच घेताना पकडला. शिवाजीनगर ठाण्यातील सपोनि गजानन क्षीरसागर यांच्यावर सराफा व्यापाऱ्याकडून चार लाख रुपये घेतल्याचा आरोप झाला. त्यानंतर निवडणुकीतही राडा झाल्याने पोलिसांची प्रतिमा मलीन होऊ लागली आहे. त्यातच शिरूरमधील प्रकाराने आणखीनच भर टाकली आहे. जिल्ह्यात गुन्हेगारी वाढत असल्याने पोलिसांच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## सावधान : राष्ट्रीय...

भासवून वाहन थांबायला भाग पाडणे आणि त्यानंतर दबा धरून बसलेल्या साथीदारांमार्फत सामुदायिक हल्ला करणे. ईंधनचोरी: रात्रीच्या वेळी हॉटेल किंवा पेट्रोल पंपावर थांबलेल्या मालवाहतूक वाहनांच्या टाकीतून डिझेल चोरी करणे. दुभाजकाचा वापर: दुभाजकामध्ये असलेल्या झाडा झुडपात लपून बसणे आणि वाहनावर हल्ला करणे. नागरिकांसाठी सुरक्षिततेच्या सूचना : १. थांबू नका: वर नमूद केलेल्या १० धोकादायक ठिकाणी आणि निर्मनुष्य रस्त्यावर गाडी थांबवणे टाळा. २. समूहाने प्रवास करा: रात्रीच्या वेळी प्रवास करताना एकटे जाणे टाळा. क्यतो अनेक वाहनांच्या समूहाने प्रवास करा. ३. दुभाजकापासून अंतर ठेवा: वाहन चालवताना दुभाजकाला एकदम खेटून चालवू नका, कारण चोरटे झुडपात लपलेले असू शकतात. ४. संशयास्पद हालचाली: रस्त्यात लाकूड, दगड किंवा संशयास्पद वस्तू दिसल्यास गाडी थांबवू नका, वेगात पुढे निघून जा. ५. मदत कोठे मागाल?: काहीही संशयास्पद वाटल्यास त्वरित जवळचे हॉटेल, पेट्रोल पंप किंवा धाबा यासारख्या लोकांची वर्दळ असलेल्या ठिकाणी आश्रय घ्या. पोलीस मदत आणि संपर्क क्रमांक: पोलिस प्रशासनाने सुरक्षेसाठी गस्ती पथके (७ वाहने) तैनात केली आहेत. आपत्कालीन परिस्थितीत खालील क्रमांकावर संपर्क साधावा: डायल ११२ – तात्काळ मदतीसाठी, पोलीस निरीक्षक शंकर शिंदे (पो. ठाणे वाशी): ९३५५१ ००१००, सपोनि गोसावी (पो. ठाणे नेकनूर): ९००९० ०८०७०, सपोनि भालेराव (पो. ठाणे येरमाळा), सपोनि बाळराजे दराडे (बीड ग्रामीण) ७७२००५०१००

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# 'महापरिनिर्वाण दिना'निमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'माहिती व जनसंपर्क'तर्फे मानवंदना

## माहितीपट आणि चित्रपटाचे महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरुन प्रसारण होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरिनिर्वाण दिना'निमित्त शनिवार, ६ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित दोन माहितीपट आणि चित्रपटाचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरून प्रसारण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून महासंचालनालयातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यात येणार आहे.

'महापुरुष डॉ.आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण सकाळी ११ वा. आणि 'बाबासाहेब आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण दुपारी १ वाजता तसेच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रुथ' या चित्रपटाचे प्रसारण दुपारी ४ वाजता करण्यात येणार आहे. माहितीपट व चित्रपटाच्या प्रसारणाच्या माध्यमातून महासंचालनालयाने डॉ. आंबेडकर यांना अनोखी आदरांजली वाहिली आहे.

महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर हे कार्यक्रम पाहता येतील.

एक्स - https://x.com/MahaDGIPR

फेसबुक - https://www.facebook.com/MahaDGIPR

यू ट्यूब - https://www.youtube.co/M-H-R-SHTR-DGIPR

'महापुरुष डॉ. आंबेडकर' माहितीपटाचे सकाळी ११ वा. प्रसारण

'महापुरुष डॉ. आंबेडकर' या दुर्मिळ माहितीपटाचे प्रसारण सकाळी ११ वाजता. महासंचालनालयाच्या एक्स, फेसबुक आणि यूट्यूब या समाजमाध्यमांवरुन करण्यात



येणार आहे. डॉ. आंबेडकर यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनांचे चित्रण तसेच, लाईव्ह फुटेजच्या चित्रीकरणाचा समावेश या ११ मिनिटांच्या माहितीपटात करण्यात आला आहे. डॉ. आंबेडकरांच्या आयुष्यावर प्रकाश टाकणारा एक महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तावेज जुलै १९६८ मध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने फिल्म्स डिव्हिजनच्या माध्यमातून तयार केला आहे.

या माहितीपटात डॉ. आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याची ऐतिहासिक घटना आणि त्यांची नेपाळ भेट तसेच मुंबईतील दादर चौपाटीवरील त्यांच्या अंतिम दर्शनाचे क्लोजअप शॉट्स आहेत. मधुकर खामकर यांनी छायांकन केले आहे. जी.जी. पाटील यांनी संकलन केले आहे. दिग्दर्शक नामदेव व्हटकर हे मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते आणि दिग्दर्शक होते. हा दुर्मिळ माहितीपट व्हटकर प्रॉडक्शनच्या बॅनरखाली नामदेव व्हटकर यांनी दिग्दर्शित केला आहे. तर संगीत दत्ता डावजेकर यांचे आहे. ज्येष्ठ चित्रपट कलाकार डेव्हिड अब्राहम या चित्रपटाचे निवेदक होते.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रुथ' या चित्रपटाचे दुपारी ४ वा. प्रसारण

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रुथ' या चित्रपटाचे प्रसारण दुपारी ४ वाजता महासंचालनालयाच्या एक्स, या समाजमाध्यमावरुन करण्यात येणार आहे. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन यांनी या चित्रपटाची संयुक्तरित्या निर्मिती केली आहे.

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील कार्य अतुलनीय आहे. प्रचंड बुद्धिमत्ता असणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. समाजामधील तळागाळातील व्यक्तींचा त्यांनी प्रामुख्याने विचार केला. शिक्षण व समाजाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा', असा मंत्र दिला. अशा असामान्य कर्तृत्व गाजवणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समजून घेण्यासाठी हा चित्रपट नक्की पहायला हवा.

या चित्रपटाचे दिग्दर्शन जब्बार पटेल यांनी केले आहे. या चित्रपटात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रमुख भूमिका अभिनेता मामूट्टी यांनी तर रमाबाई आंबेडकर यांची भूमिका सोनाली कुलकर्णी यांनी साकारली आहे. मोहन गोखले, मृणाल कुलकर्णी यांच्या देखील या चित्रपटात भूमिका आहेत. निर्मिती सहाय्य राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ (एनएफडीसी) यांनी केले असून पटकथा लेखन सोनी तारापोरवाला, अरूण साधू, दया पवार यांनी केले आहे. चित्रपटाचे संशोधन डॉ. य. दि. फडके यांनी केले. सल्लागार श्याम बेनेगल आहेत, चित्रपटाची वेशभूषा भानु अथैय्या, संगीत अमर हल्दीपूर, फोटो दिग्दर्शन अशोक मेहता यांचे आहे.

### 'बाबासाहेब आंबेडकर' माहितीपटाचे दुपारी १ वा. प्रसारण

**भारत सरकारच्या 'फिल्म्स डिव्हिजन' ची निर्मिती असलेल्या 'बाबासाहेब आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण दुपारी १ वाजता महासंचालनालयाच्या एक्स, फेसबुक आणि यूट्यूब या समाजमाध्यमांवरुन करण्यात येणार आहे. 'फिल्म्स डिव्हिजन'च्या वतीने एन.एस. थापा यांनी १९८१ मध्ये या माहितीपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटाला ए.वी. भाष्यम यांचे दिग्दर्शन लाभले आहे.**

# धुक्यात हरवली वाट... आठवड्याचा शेवट थंडीनंच !

**मुंबई । प्रतिनिधी**

देशाच्या उत्तरेकडे असणाऱ्या राज्यांमध्ये प्रामुख्यानं उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि काश्मीरच्या खोऱ्यात पर्वतीय भागांवर बर्फाची चादर पाहायला मिळत आहे. तर, मैदानी भागांमध्येही किमान तापमानात घट पाहायला मिळत आहे. दक्षिण किनारपट्टीवर कमी दाबाच्या पट्ट्याची स्थिती असल्यामुळं केरळ आणि तामिळनाडूसह आंध्र प्रदेशात मात्र पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या दोन्ही स्थितींचा कमीजास्त परिणाम महाराष्ट्रावर दिसून येत आहे. ज्यामध्ये राज्यातील कमाल आणि किमान तापमानात चढ- उतार झाल्याचं स्पष्ट होत आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार पुढील ४८ तासांनंतर राज्यात सध्या जाणवतो आहे त्याहून गारठा अधिक वाढणार असून, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात ही स्थिती असेल. कोकणासह कोल्हापूर, सातारा आणि पुण्यातील घाट क्षेत्रावरसुद्धा थंड हवेचे झोत




वाहणार असून, सोबत दाट धुक्याची चादर आणणार आहेत. ज्यामुळं या भागांमध्ये दृश्यमानता कमी होईल. राज्यात किमान तापमानाचा आकडा सरासरी ८ अंशांदरम्यान राहणार असून, कमाल तापमान ३० ते ३२ अंशांदरम्यान राहणार असल्याचा प्राथमिक अंदात वर्तवण्यात आला आहे.

### थंडीची लाट ओसरली असली तरीही...

गेल्या ४८ तासांसाठी राज्यात थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. ज्यानंतर ही लाट ओसरली असली तरीही गारठा मात्र कायम आहे. मुंबई शहर आणि उपनगरांमध्येही गुलाबी थंडी अनुभवायला मिलत असून, रात्री आणि पहाटेच्या वेळी ही स्थिती अधिक अनुभवता येत आहे. येत्या काही दिवसांमध्ये हवामानाची ही स्थिती अन् राज्यातील गारठा कायम राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आहे. या स्थितीस कोकण अपवाद ठरणार असून, तिथं मात्र दिवसा तापमानाचा पारा वाढणार असल्यानं उष्णतेचा दाह सोसावा लागू शकतो. दिवस मावळतीला गेल्यानंतर मात्र तापमानात किंचित घट अपेक्षित असल्याचं सांगण्यात येत आहे.

## छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये वर्किंग वुमेन्स हॉस्टेल व ओल्ड एज होम उभारण्याबाबतचा प्रस्ताव सादर करा – गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये वर्किंग वुमेन्स हॉस्टेल व ओल्ड एज होम उभारण्यात येणार असून या प्रकल्पासाठी आवश्यक जागा, सुविधा आणि निधी नियोजन याबाबत तातडीने शासनाकडे प्रस्ताव सादर करा, असे निर्देश गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज दिले. गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या (म्हाडा), कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी बैठकीला मुख्य अधिकारी श्री. दत्तात्रय नवले, उप मुख्य अधिकारी श्री. जयकुमार नामेवार व कार्यकारी अभियंता श्री. सुधाकर बाहेगव्हाणकर यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते. महिलांच्या सुरक्षेसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानपूर्वक जीवनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे ही शासनाची जबाबदारी आहे.

# फ्री WiFi देणारी महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका

## मोबाईल रिचार्ज करायची गरज नाही; कुठेही फिरा फुकट इंटरनेट मिळणार

**मुंबई । प्रतिनिधी**

मीरा-भाईंदर शहर भविष्यात डिजिटल शहर म्हणून ओळखले जाणार आहे. मीरा-भाईंदर महानगरपालिकेने मीरा-भाईंदरला मोफत वायफाय शहर बनवले जाईल अशी घोषणा केली आहे. महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. महानगरपालिका इमारतीत झालेल्या आढावा बैठकीत ही घोषणा केली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली, त्यांच्यासोबत एमबीएमसी आयुक्त राधा विनोद शर्मा आणि विविध विभागांचे वरिष्ठ




अधिकारी उपस्थित होते. प्रताप सरनाईक म्हणाले की, मीरा रोड-भाईंदर हे देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या शहरांपैकी एक आहे. गेल्या तीन वर्षांत, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, शहरात १,८०० कोटींचे विकास प्रकल्प पूर्ण झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रातील उदयोन्मुख शहरांमध्ये मोफत वाय-फाय सुविधा देण्याची मोठी मोहीम सुरू झाली, असेही त्यांनी सांगितले. मीरा-भाईंदरला ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाची मोफत उपलब्धता देणारी ही वाय-फाय तंत्रज्ञान प्रगतीची एक नवीन लाट आहे. त्यांनी असेही नमूद केले. स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स आणि महाराष्ट्र सरकार यांच्यामध्ये, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार झाला. यामुळे राज्यातील दुर्गम भागांमध्ये उपग्रह आधारित इंटरनेट सेवा पोहोचणार आहे. स्टारलिंकशी भागीदारी करणारं महाराष्ट्र हे भारतातील पहिलं राज्य ठरलं आहे.

## 'शाळा बंद' आंदोलनात शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : जितेंद्र डोंगरे, आत्माराम वाव्हळ

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी उद्या, ५ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आलेल्या राज्यव्यापी 'शाळा बंद' आंदोलनाला महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीने जाहीर पाठिंबा दिला आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे आणि बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी केले आहे. टीईटी सक्ती, अन्यायकारक संचमान्यता धोरण, शिक्षकांकडून घेतली जाणारी अशैक्षणिक कामे तसेच शिक्षक-कर्मचाऱ्यांचे इतर प्रलंबित प्रश्न यावर त्वरित



उपाययोजना व्हाव्यात, या मागण्यांसाठी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीने उद्या राज्यभर *'शाळा बंद'*ची हाक दिली आहे. या आंदोलनाला समर्थन देताना विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनीही राज्यातील सर्व विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील पदाधिकारी, सदस्य, तसेच विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

खंडेराव जगदाळे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत समितीचे सर्व विभागीय, जिल्हा व तालुका पदाधिकारी, सदस्य आणि शिक्षक मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष वाव्हळ यांनी दिली. शाळा बंद आंदोलनाची माहिती देताना विभागीय कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे आणि जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ म्हणाले शिक्षण व्यवस्थेतील अन्यायकारक धोरणांविरोधात आवाज बुलंद करण्यासाठी एकजुटीने रस्त्यावर उतरले तरच शिक्षकांना न्याय मिळेल. त्यामुळे उद्याच्या शाळा बंद आंदोलनात बीड जिल्ह्यातील सर्व अनुदानित विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

## आयडॉल शिक्षक शाळेसोबतच समाजातही मोठा बदल घडवून आणतील – शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे




**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

शिक्षणातील आव्हाने स्वीकारत गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षण देणारे आयडॉल शिक्षक शाळेसोबत समाजातही मोठा बदल घडवून आणतील,असा विश्वास शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी आज व्यक्त केला. समर्पित भावनेने काम करणाऱ्या शिक्षकांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचेही ते म्हणाले. तापडिया नाट्यमंदिर येथे शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे आयडॉल शिक्षक एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे बोलत होते. यावेळी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह , राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अंकित, शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांच्यासह राज्यभरातील आयडॉल शिक्षक म्हणून निवड झालेले शिक्षक उपस्थित होते.

# गेवराईत दहशत पसरविणाऱ्या बाळराजे पवार यावर मकोका लावा : भाऊसाहेब डावकर

**बीड । प्रतिनिधी**

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या त्रिंबक उर्फ बाळराजे पवार याने सोबतीला गुंड प्रवृत्तीचे लोकं बरोबर घेऊन माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या गेवराई येथील कृष्णाई निवासस्थानावर हल्ला करून त्यांचे स्विय सहाय्यक, माझे बंधु ज्यांचा शांत,संयमी, अभ्यासु, संस्कारी व्यक्तिमत्व म्हणून गेवराईतच नाही तर पूर्ण बीड जिल्ह्यात त्यांची ओळख आहे. अशा श्री.अमृतभैय्या डावकर यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण केली.नगर परिषद निवडणुकीतही उमेदवार आणि मतदारांना त्याने धाक-दडपशाही केली असून गुंडांना सोबत घेऊन गेवराई शहरात दहशत निर्माण करणाऱ्या त्रिंबक उर्फ बाळराजे माधवराव पवार याला मकोका लावून त्याला जेरबंद करा अशी मागणी भाऊसाहेब



डावकर यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात केली आहे.

भाऊसाहेब डावकर पुढे म्हणाले की, बाळराजे पवार याने मंगळवार, २ डिसेंबर २०२५ रोजी माजी आ.अमरसिंह पंडित यांची हत्येचा कट रचून पूर्वनियोजितपणे त्यांच्या कृष्णाई निवासस्थानी भ्याड हल्ला केला. तेथे उपस्थित असलेले अमरसिंह पंडित यांचे स्विय सहाय्यक, माझे भाऊ श्री.अमृतभैय्या डावकर यांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु सुडाने पेटलेल्या बाळराजे पवार यांनी त्यांच्या सोबत आणलेल्या गुंडांसह अमृत डावकर यांच्यावर जीवघेणा हल्ला केला.या घटनेमुळे गेवराई शहरात मोठी दहशत निर्माण झालेली आहे. बाळराजे पवार यापूर्वीही शिवसेनेचे जिल्हा प्रमुख स्व.कैलास बेदरे यांची त्यांच्या घरी जाऊन हत्या केल्यामुळे त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली होती.शासनाने त्याची शिक्षा माफ केल्यामुळे अलिकडच्या काळात कारागृहाच्या बाहेर येऊन त्याने गेवराई शहरात दहशत निर्माण केली आहे. नुकत्याच झालेल्या नगर पालिकेच्या प्रचारा दरम्यान अमरसिंह पंडित यांच्यावर खालच्या पातळीवर जावून टिकाटिप्पणी करून धमकीवजा भाषणे केली.प्रचारा दरम्यान उमेदवार आणि मतदारांना धमक्या दिल्या, संघटीत गुन्हेगारी कृत्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे गेवराई शहरात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे,आम्ही गेवराई शहराचे पाटील आहोत, डॉन आहोत. आम्ही कोणालाही घाबरत नाही.या अविर्भावात राहून त्यांनी सामान्य माणसाला धाक दडपशाही केली असल्यामुळे गेवराई शहरात दहशत निर्माण झाली आहे. लोकशाहीचा उत्सव असलेल्या मतदान प्रक्रियेत अडथळा आणण्याच्या दृष्टीने माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या निवासस्थानावर कटकारस्थान रचून हल्ला करणाऱ्या त्रिंबक उर्फ बाळराजे पवार यावर संघटीत गुन्हेगारी कायद्यान्वये मकोका लावावा आणि त्याला कायमचे जेलमध्ये ठेवा.अशी मागणी भाऊसाहेब डावकर यांनी पत्रकाच्या शेवटी केली.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश,**
**व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १८३२/२०२५

अर्जदार – (१) शुभांगी भ्र. अनिल दहिवाळ वय–३१ वर्ष, धंदा घरकाम, रा. बलभीम नगर पेठ बीड, ता. जि. बीड., (२) समृध्दी पि. अनिल दहिवाळ वय ११ वर्षे, धंदा शिक्षण, (३) सई पि. अनिल दहिवाळ वय–०४ वर्षे, धंदा काही नाही, अज्ञान अर्जदार क्र. २ व ३ करिता, अ.पा.क आई अर्जदार क्र. १ रा. वरील प्रमाणे, ४) नंदाबाई भ्र. कृष्णा उर्फ किसन दहिवाळ वय ५५ वर्षे, धंदा घरकाम रा. बलभीम नगर पेठ बीड, ता. जि. बीड. ५) कृष्णा उर्फ किसन पि. दत्तोपंत दहिवाळ, वय ६२ वर्षे, धंदा शेती, रा. बलभीम नगर पेठ बीड, ता. जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ मे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे अनिल किसन दहिवाळ यांचे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे अनिल किसन दहिवाळ, रा. बलभीम नगर पेठ बीड, ता. जि. बीड हे दिनांक ०२/१०/२०२५ रोजी ते घरी बलभीमनगर पेठ बीड, ता. जि. बीड. येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १. ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताच्या मुली असून, अर्जदार क्र. ४ व ५ हे मयताचे आई – वडील आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, शासकीय, निमशासकीय कार्यालयीन कामकाजासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरील अर्जदार हे मयताचें वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती पुराव्यणीशी न्यायालयात सादर कराव्यात. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्यांचा याबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिले जाईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील दिनांक १५/०१/२०२६

(ॲड. राम ज. दहिवाळ यांच्यामार्फत)

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर बीड

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. ०५ डिसेंबर २०२५ ● पान ४



*श्री दत्त जयंती उत्सव – मौजे पिंपळनेर आज मौजे पिंपळनेर येथे श्री दत्त जयंती निमित्त आयोजित अखंड नामजप यज्ञ व सामूहिक सप्ताह कार्यक्रमास शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी सहकुटुंब उपस्थित राहून श्री स्वामी समर्थ महाराजांची मनोभावे आरती करून दर्शन घेतले. यावेळी सोबत अध्यक्ष राजाभाऊ नरवडे,युवा नेते उमेशजी आनेराव, युवा नेते गणेशजी पटाईत,युवा नेते सतीशजी इतापे,पत्रकार गणेशजी तांबे, युवा नेते पिनू डांगे, सिद्धेश्वर नाना तिरगुळ,युवा नेते भागवतजी कदम, ज्योतिबा घाडगे, मेघराज भुजबळ तसेच सर्व स्वामी समर्थ सेवेकरी उपस्थित होते.*



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव खांडेपारगाव ता.जि.बीड येथे दत्त जयंती निमित्त वृक्ष लागवड करण्यात आले. यावेळी हरित महाराष्ट्र सुंदर महाराष्ट्र मोहीम राबवण्यात आले. यावेळी उपस्थित संस्थेचे उपाध्यक्ष विशाल डोळस, सचिव तेजस पवार, सहसचिव रोहन डोळस,सदस्य तेजस्विनी पवार व ग्रामस्थ बहु संख्येने उपस्थित होते.*

# बीडमध्ये 'हमारा शौचालय हमारा भविष्य' मोहीम कागदावरच?

## शाळेसाठी ग्रामस्थांनी ६ गुंठे जमीन, लोकवर्गणीतून रंगरंगोटी–लाईटफिटींग ; तरीही स्वच्छतागृहाचे काय ?

### बेलगाव वस्तीवरील पालकांची मागणी ; पालकमंत्री अजितदादा, मंत्री आदिती तटकरे आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिनानिमित्त १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत 'हमारा शौचालय, हमारा भविष्य' ही विशेष मोहीम राज्यभर राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील सर्व १३५६ गावांतील वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती, रंगरंगोटी करून ती वापरात आणण्याचे निर्देश विभागाकडून देण्यात आले आहेत. आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण आणि उमेद विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले आहे.

मात्र, ही मोहीम प्रत्यक्षात कागदोपत्रीच राबविली जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते आणि जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. ग्रामीण भागातील अनेक शाळा व अंगणवाड्यांमध्ये आजही शौचालयांचा अभाव असून, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची गंभीर नोंद त्यांनी निवेदनात केली आहे.



डॉ. ढवळे म्हणाले की, शौचालय ही केवळ सुविधा नसून आरोग्य, सुरक्षितता आणि प्रतिष्ठेशी निगडित मूलभूत गरज आहे. अनेक निवेदने व आंदोलने करूनही प्रशासन जागे नाही. त्यांनी ग्रामीण भागातील सर्व शाळा–अंगणवाड्यांमध्ये तातडीने शौचालयांची निर्मिती, अपूर्ण शौचालयांची दुरुस्ती आणि वापरासाठी सुसज्जता करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भातील लेखी निवेदन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पालकमंत्री अजितदादा पवार आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांना जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत पाठविण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारींची मोहीम कागदावरच? केंद्र प्रमुखांना साधे पत्रही नाही – डॉ. ढवळे

▶▶ उर्वरित पान २ वर

# लिंबागणेश येथील श्रीकृष्ण मंदिरात दत्तजयंती मोठ्या उत्साहात साजरी

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्रसिद्ध श्रीकृष्ण मंदिरात आज दि.०४ गुरुवार रोजी १२८ वी दत्त जयंती अत्यंत भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. मंदिर परिसर विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता तर फुलांच्या आकर्षक सजावटीमुळे संपूर्ण मंदिराला वेगळाच दिव्य आणि मंगलमय असा नजार मिळत होता. दत्त जयंतीनिमित्त अभिषेक, महापूजा, आरती, दत्तयाग यांसह भजन, कीर्तन, प्रवचन, व्याख्यान अशा विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दत्त गुरूच्या जयघोषांनी संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून दर्शन घेतले. कार्यक्रमानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हिंदू धर्मात दत्त जयंतीला विशेष महत्व आहे. मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी भगवान दत्तात्रेयांचा जन्म झाल्यामुळे दरवर्षी हा दिवस मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या संयुक्त अवतार म्हणून दत्तात्रेयांचे वर्णन धर्मग्रंथांत आढळते. गुरुपरंपरेला मानणाऱ्या भाविकांसाठी दत्तात्रेयांची पूजा केल्याने त्रिमूर्तींची पूजा केल्याइतके पुण्य प्राप्त होते, असे मानले जाते. या दिवशी भक्तीपूर्ण उपासना केल्याने घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि वातावरण शांती, सौभाग्याने परिपूर्ण होते, अशी श्रद्धा आहे. दत्त जन्मोत्सव सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमात किर्तनकारांनी भावस्पर्शी कीर्तन, भक्तिमय गाणी आणि दत्त तत्त्वज्ञानावरील मार्गदर्शन करून वातावरण अधिक पवित्र आणि आध्यात्मिक केले. उपस्थित भाविकांनी या भव्य आणि भक्तिरसपूर्ण सोहळ्याचा मनसोक्त लाभ घेतला.



# पत्रकार अविनाश कदम यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**आष्टी । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ प्रणीत तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी यांच्या वतीने प्रथमच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'जिजाऊ माँसाहेब आदर्श राज्यस्तरीय पुरस्कार' देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमातर्फे यावर्षीचा आदर्श पत्रकारिता पुरस्कार दै लोकमत व मराठवाडा साथीचे आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे यांनी दिली. अविनाश कदम हे दैनिक लोकमत व मराठवाडा साथीचे आष्टी तालुका प्रतिनिधी तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तसेच मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष आहेत. गेल्या १७ वर्षांपासून पत्रकारितेत सक्रिय असलेल्या कदम यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कृषी, आरोग्य, धार्मिक या विविध



▶▶ उर्वरित पान २ वर

# माजलगाव सिधफना नदीत ऊस तोड़ मजुर बुडाला



**माजलगाव । प्रतिनिधी**

सिधफना नदीत व्यक्ती बुडाला. प्रशासनाच्या वतीने शोध मोहिम सुरू आहे. माजलगांव येथे मोठे धरण आहे,त्याला सिधफना नावाची मोठी नदी आहे. त्या नदीत मोठे विहीरीसारखे बोगदे आहे असं माहीतगार लोक सांगतात. पुर्ण माजलगावाला त्या नदीला विळखा आहे. एक ऊस तोड़ मजुर आहे सिंधफना नदीत बुडाला आहे असे सांगण्यात येत आहे कारण गुलदस्त्यात आहे पुढील तपास पोलिस करत आहेत. मजुराला पाण्याचा अंदाज न आल्याने तो बुडाला, असे स्थानिकांकडून सांगितले जात आहे .गेल्या तीन दिवसांपासुन पथक घटनास्थळी शोध घेत आहे. माजलगांव प्रशासन व बीड पथक घटनास्थळी तळ ठोकून आहे

# ट्रक–टेम्पोचा भीषण अपघात : टेप्मोचालक जागीच ठार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जालन्याहून हुमनाबादला सळई घेऊन जाणारा भरधाव वेगातील ट्रक रस्त्यावर पंक्चर झालेल्या खताच्या टेम्पोवर आदळून झालेल्या अपघातात टेम्पो चालक जागीच ठार झाला. अन्य दोन जण जखमी झाले. ज्योतीराम सदाशिव जाधव (वय ४३ रा. लक्ष्मी टाकळी ता. पंढरपूर जि. सोलापूर) असे मयत टेम्पो चालकाचे नाव आहे. हा अपघात बुधवारी सकाळी साडेआठ वाजता लोखंडी सावरगाव जवळील राज्य महामार्गावर घडला.

अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी सावरगाव जवळील बीड राज्य महामार्गावर बुधवारी सकाळी साडेआठ वाजता खताचा टेम्पो क्रं. एम.एच.–११. ए.एल.६३७५ पंक्चर झाल्याने रस्त्यावर उभा होता. याच वेळी जालन्याहून हुमनाबादला सळई घेऊन जाणारा ट्रक क्रमांक के.ए. ५६–६८५६ टेम्पोवर पाठीमागून आदळून झालेल्या अपघातात टेम्पोचालक ज्योतीराम सदाशिव जाधव हा टेम्पोखाली चिरडून जागीच ठार झाला. तर ट्रक चालक दयानंद हनुमंत आप्पा वय ५१ व पंक्चर काढण्यासाठी आलेले लोखंडी सावरगाव येथील फारूख युनूस शेख वय ३१ हे दोघेही सदरील अपघातात जखमी झाले असून त्यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघाताच्या वेळी टेम्पो रस्त्याच्या कडेला खड्ड्यात जाऊन पलटी झाला. अपघाताची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मुरलीधर खोकले, सहपोलिस निरीक्षक डॉ. चंद्रकांत जगताप, बीट अंमलदार पी. एस. ऊळे, राहुल भोसले यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. टेम्पो चालकाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात पाठवण्यात आला.




## बीडमध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणीवर छेडछाड व अत्याचाराचा प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणीवर छेडछाड व अत्याचाराच्या प्रयत्नाचा प्रकार बीडमध्ये घडला. हा प्रकार चालत्या ऑटो रिक्षामध्ये घडला असून ही विद्यार्थिनी क्लास मधून घराकडे जात असताना एक अनोळखी व्यक्ती रिक्षात बसला व विद्यार्थिनीचा घर सोडून तिसऱ्या च रोडवर घेऊन निघाला. तिने चालकाला विचारले इकडे कुठे घेऊन जात आहात तर तो म्हणला तो बसलेल्या व्यक्तीला सोडण्यासाठी जात आहोत. एका अनोळखी ठिकाणी नेऊन मुलीचे तोंड स्कार्फने गुंडाळले आणि तोंड दाबले. त्यानंतर तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला मात्र तरुणीने तीव्र आवाजाने ओरडून विरोध केल्यावर दोन्ही आरोपी ▶▶ उर्वरित पान २ वर

# देवी बाबुळगाव ते हिंगणी रस्ता झाला खुला : तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मध्यस्थीला यश

**बीड । प्रतिनिधी**

देवी बाबुळगाव ते हिंगणी या सुमारे साडेतीन किलोमीटर लांबीच्या महत्त्वपूर्ण ग्रामीण रस्त्याचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला आहे . गुरुवार दि . ४ डिसेंबर रोजी हा रस्ता अधिकृतपणे खुला करण्यात आला . अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या मनात साठलेली वेदना , चिखलातून वाट काढण्याची बंधनं आणि रोजच्या धावपळीतला त्रास याला आज पूर्णविराम मिळाला आहे . देवराव वस्तीसह परिसरातील शेतकऱ्यांचा संघर्ष आता संपला आहे .

हक्काचा रस्ता असूनही अनेक वर्षे वाद सुरू होता . गावकरी , सरपंच यांनी मध्यस्थी करून रस्ता खुला करण्याचा प्रयत्न अनेकदा केला , पण त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही . शेतकऱ्यांच्या पायातील चिखल , खांद्यावरचा शेतीमाल आणि मनातील निराशा ही जणू या रस्त्याचीच कहाणी झाली होती . अखेर राज्याच्या महसूल खात्याच्या निर्णयांमुळे आणि जिल्हा प्रशासनाच्या संवेदनशील भूमिकेमुळे प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे दृग्गोचर झाली . राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतरस्त्यांबाबत घेतलेल्या निर्णयांमुळे जिल्हास्तरावरील अधिकारी अधिक सतर्क झाले आहेत . संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर शेतकऱ्यांच्या रस्त्याविषयी नेहमीच सजग असतात आणि रस्ते तात्काळ मोकळे करण्याचे स्पष्ट आदेश देतात . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने दखल घेण्यासाठी प्रसिद्ध आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक हे तहसीलदार आणि अधिनस्त महसूल अधिकाऱ्यांना थेट संपर्क करत शेतकऱ्यांची कामे तत्काळ मार्गी लावण्याबाबत आग्रही असतात . उपविभागीय अधिकारी कविता जाधव शेतकऱ्यांच्या समस्या कणवाळूपणे ऐकून त्यावर उपाय शोधण्यात तत्पर असतात . वरील प्रकरणात तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्वतः पुढाकार घेतला . मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे आणि ग्राम महसूल अधिकारी कमलेश निर्मळ यांनी सतत भेटी देऊन पंचनामे केले, समजूत



▶▶ उर्वरित पान २ वर

# बाळराजे पवार बदनाम आणि स्वतः साहू? विजयसिंह पंडितांनी ही नौटंकी बंद करावी : युधाजित पंडित

## ● शांत गेवराईला अशांत न करण्याचा दिला सल्ला

**गेवराई । प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणुकीच्या मतदानादिवशी पंडित – पवार यांच्यात झालेल्या वादानंतर आ विजयसिंह पंडित यांनी बाळराजे पवार यांच्यावर घणाघाती टीका करून त्यांना गुंड, खुनी असा शब्दप्रयोग करून बदनाम करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. मात्र स्वतःला सत्तेत येण्यासाठी हेच बाळराजे पवार त्यांना गोड लागत होते. आता मात्र अचानक ते वाईट का झाले? दुसरे वाईट आणि आपणच स्वतः साहू हे दाखवण्याचा प्रयत्न करणाऱ्या बीडच्या अमरसिंह पंडित आणि आमदार विजयसिंह पंडित यांनी ही नौटंकी बंद करावी कारण त्यांच्या या नौटंकीला गेवराई तालुक्यातील जनता भिक घालत नाही असे रोखठोक प्रतिपादन भाजपाचे माजी सभापती युधाजित पंडित यांनी केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आ अमरसिंह पंडित यांचे स्वीय सहाय्यक अमृत डावकर यांनी बाळराजे पवार यांचा अमरसिंह पंडित यांना संपवण्याचा डाव होता असा गौप्यस्पोट केला. यालाच आमदार विजयसिंह पंडित यांनी दुजोरा देऊन, बाळराजे पवार यांच्यावर घणाघाती आरोप करत ते गुंड आणि शिक्षा भोगून आलेले गुन्हेगार असल्याचे म्हटले होते. या प्रतिक्रियांचा भाजपाचे माजी सभापती युधाजित पंडित यांनी सोशल मीडियातील आपल्या अकाउंट वरून रोखठोक प्रतिक्रिया देऊन त्यांचा समाचार घेतला आहे. त्यांनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की,





मतदानाच्या दिवशी गेवराई शहरात घडलेली घटना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्त्यांकडून चुकीच्या पद्धतीने जनतेसमोर मांडली जात आहे. भाजपा नेते बाळराजे पवार अत्यंत संयमी आणि लोकांमध्ये मिसळून काम करणारे व्यक्ती आहेत. हे गेवराई तालुक्यासह बीड जिल्ह्यातल्या बहुतांश लोकांना माहित आहे. मतदानाच्या दिवशी जाणीवपूर्वक आणि चुकीच्या पद्धतीने जर कोणी कोणाची आई किंवा पत्नी यांना अपशब्द वापरत असेल, अपमानित करत असेल तर हे कोणताही स्वाभिमानी मुलगा किंवा पती सहन करू शकत नाही. जर नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ गीताभाभी पवार यांच्या बाबतीत मतदान बुथवर कोणी चुकीचं वागत असेल आणि बोलत असेल तर बाळराजे पवार यांनी काही बांगड्या भरलेल्या नाहीत हे विरोधकांनी समजून घेणे गरजेचे आहे. जी घटना घडली ती क्शन ला रिएक्शन होती.

आज बाळराजे पवार यांच्या बाबतीत जुन्या प्रकरणाचा उल्लेख करून विरोधक त्यांना बदनाम करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. एवढेच नाही तर बाळराजे पवार हे हातात शस्त्र घेऊन कृष्णाई मध्ये घुसून अमरसिंह पंडित यांच्या हत्येचा त्यांचा प्रयत्न होता असा चुकीचा आरोप करून विजयसिंह पंडित हे वेगळेच राजकारण करू पाहत आहेत. हे गेवराईच्या सगळ्या जनतेच्या लक्षात आले आहे.

आज ज्या बाळराजे पवार यांच्याबाबत अपशब्द बोलून त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न अमरसिंह पंडित आणि विजयसिंह पंडित करत आहेत, त्यांना यापूर्वी त्यांच्यासोबत बाळराजे पवार असताना ते चांगले कसे वाटले? स्वतः च्या राजकीय फायद्यासाठी बाळराजे पवार यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ▶▶ उर्वरित पान २ वर